माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळणेबाबत..

परिशिष्ट – अ

राज्य शासकीय माहिती अधिकारी

(केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ (२) अनुसार)

प्रति,
जन माहिती अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर - पश्चिम ४०११०१

| | | |
|---|---|---|
| **१) अर्जदाराचे पूर्ण नाव** | : | संजय नारायण पांगे |
| **२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता** | : | बी/२०१, सरस्वती मार्केट, सरस्वती नगर, गुरुद्वारा लेन, नवघर रोड, भाईंदर पूर्व<br>पिन: ४०११०५<br>मो. नं. - ९८२११२०६९६९<br>ई-मेल : socialactivistsanjaypange@gmail.com |
| **३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील** | : | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ओल्या कचऱ्याची विल्हेवाट विकेंद्रीकरण पद्धतीने बायो-गॅस मार्फत वीज निर्मिती करण्यासंदर्भातील दि. २६/१०/२०१८ रोजीच्या निविदेची माहिती मिळणे बाबत. |
| **(एक) माहितीचा विषय -** | : | १) उपरोक्त आवश्यक असलेल्या माहितीच्या संदर्भात निविदा मागविण्यापूर्वी मा. आयुक्त यांची तांत्रिक मान्यता अथवा मंजुरी घेतली होती काय? असल्यास त्या टिपणीची छायांकित सत्यप्रत उपलब्ध करून द्यावी. |

२) संदरची निविदा सन २०१९ रोजी मागविण्यात आलेली होती सन २०१९-२० ह्यावर्षीच्या अर्थसंकल्पात उपरोक्त विषयासाठी २८ कोटी १९ लाख रुपयांच्या खर्चाची तरतूद करण्यात आली होती काय ? असल्यास त्याची छायांकित सत्यप्रत उपलब्ध करून द्यावी.

३) उपरोक्त विषयासंदर्भात मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सर्व ठराव, तांत्रिक सल्लागारांचे अहवाल, डी.पी.आर. अहवाल, स्थायी समितीची मान्यता, मंजूर निविदाधारकाशी करण्यात आलेल्या कार्यादेशाची व करारनाम्याची छायांकित सत्यप्रत व आजपर्यंत देण्यात आलेली देयके उपलब्ध करून द्यावी.

४) सदरचा प्रकल्प ८ विविध आरक्षित भूखंडावर अर्धवटरित्या उभारला गेलेला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये आरक्षित भूखंडावर आरक्षण बदलासंदर्भात तथा आरक्षण रद्द करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाची मंजुरी घेण्यात आली होती काय? असल्यास त्याची छायांकित सत्यप्रत उपलब्ध करून द्यावी.

**(दोन) माहिती ज्यांच्याशी संबंधित असेल तो कालावधी** : सन २०१८ ते आजतयागत

**(तीन) माहिती टपालाने हवी की व्यक्तिशः** : स्पीड पोस्ट / ई-मेल

दिनांक: २१/०३/२०२२ ठिकाण : भाईंदर

अर्जदाराची सही

**(संजय नारायण पांगे)**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

कार्यकारी अभियंता (घनकचरा विभाग) यांचे कार्यालय
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज
मार्ग, भाईंदर (प.), ता.जि.ठाणे – ४०१ १०१
जा.नं. मनमा/घप्रवि/माअ/ ९५ /२०२१-२२
दि. १३/०४/2022

प्रति,
**श्री. संजय नारायण पांगे,**
**बी/201, सरस्वती मार्केट, सरस्वती नगर,**
**गुरुव्दारा लेन, नवघर रोड, भाईंदर पुर्व**
**पिन - 401105.**

**विषय :-** केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005 चा कलम 5 (2)
मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ओल्या कचऱ्याची विल्हेवाट
विकेंद्रीकरण पध्दतीने बायोगॅस मार्फत वीज निर्मिती करण्यासंदर्भात
दि.26/10/2018 रोजीच्या निविदेची माहिती मिळणेबाबत...

**संदर्भ :-** आपला दि.24/03/2022 रोजीचा माहिती अर्ज.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये या विभागातील कार्यालयीन अभिलेख कक्ष तपासले असता आपणांस आवश्यक असलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने आपण कार्यालयिन वेळेत दिनांक 19/04/2022 रोजी 3.00 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय पहिला मजला पाणी पुरवठा विभाग येथे उपस्थित राहुन माहितीचे अवलोकन करण्यात यावे.

तद्नंतर आपणांस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

**जनमाहिती अधिकारी**
**(घनकचरा प्रकल्प)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

Received
Sanjay Pange
13.04.2022